**वि.दि.दा.क्र.४४/२०२२**

## आदेश नि.३४ खाली

वादीने सदरचा अर्ज दावा दुरुस्तीसाठी दाखल केला. प्रतिवादी क्र.१ ते ७ तर्फे म्हणणे देऊन अर्जास विरोध दर्शविण्यात आला. दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

०२. वादीचे असे म्हणणे आहे की, दावा दाखल करताना काही मिळकतीचा समावेश करण्याचे राहून गेले आहे. तसेच कैफियतीमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ ते ७ यांचे हक्कसोडपत्र करून घेतल्याचे निदर्शनास आले. त्याबाबत दाव्यात उल्लेख करणे आवश्यक आहे. दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही. सबब, अर्ज मंजूर करण्यात यावा.

०३. प्रतिवादीतर्फे असे म्हणणे देण्यात आले की, दुरुस्तीनुसार गट क्र.२७ च्या सर्व हिस्सेदारांना प्रस्तुतच्या दाव्यात सामील करण्याची विनंती नाही. दावा दुरुस्तीस कोणतेही कारण नाही. फेरफार रद्द करण्यासाठी अपील दाखल करणे आवश्यक आहे. हक्कसोडपत्रामध्ये वादीचा समावेश नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा.

०४. गट क्र.२७ चा प्रस्तुतच्या दाव्यात समावेश करण्याची आवश्यकता नाही असे प्रतिवादींचे म्हणणे नाही. सबब, सदर जमीन दुरुस्तीद्वारे दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. इतर हिस्सेदारांचा वादीप्रतिवादींच्या जमिनीशी संबंध नाही असे वादीचे म्हणणे आहे. सबब, त्याबाबतचा आक्षेप योग्य नाही. हक्कसोडपत्र करून घेतल्याचेही प्रतिवादींनी नाकारले नाही. परिणामी त्याबाबत दाव्यामध्ये उल्लेख करणे आवश्यक आहे. दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

संगमनेर. (एस. यु. महादार)

दिनांक :– ०५/१०/२०२४. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, संगमनेर.